## ~~~ स्पर्धेची नियमावली ~~~

१. स्पर्धक विदर्भातील विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त महाविद्यालयाचा स्नातक/स्नातकोत्तर स्तरावर शिक्षण घेत असणारा विद्यार्थी असावा.
२. इच्छूक महाविद्यालयाने दोन विद्यार्थ्यांचा एकच संघ पाठवावा. एक स्पर्धक विषयाच्या अनुकूल बाजूने व एक स्पर्धक विषयाच्या प्रतिकूल बाजूने विचार मांडणारा असावा. एका विद्यार्थ्यास स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.
३. प्रत्येक स्पर्धकास ५+१ मिनिटे वेळ दिला जाईल.
४. स्पर्धकांनी महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत आणावे.
५. स्पर्धकांचा प्रवास खर्च, राहण्याचा व इतर खर्च आयोजक करणार नाहीत.
६. विजेत्या संघास सांघिक चषक दिल्या जाईल.
७. स्पर्धेचा निकाल जाहिर करणे व पारितोषिक वितरण स्पर्धा संपल्यानंतर त्याच दिवशी पार पडेल.
८. स्पर्धकांना मराठी/हिंदी/इंग्रजी पैकी कोणत्याही एका भाषेत आपले विचार मांडता येतील.
९. स्पर्धकांनी स्पर्धेच्या दिवशी सकाळी ८.३० पर्यंत स्पर्धास्थळी उपस्थित राहणे अनिवार्य असेल.
१०. स्पर्धकांचा क्रम लॉटस टाकून निश्चित केला जाईल.
११. स्पर्धकाने आपले विचार सांसदीय भाषेत व्यक्त करावे.
१२. परिक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

**प्रवेश अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख २५ जाने. २०१९**

### पत्रव्यवहारासाठी पत्ता

प्राचार्य - **औषधनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था,**
बोरगांव (मेघे), वर्धा जि. वर्धा - *442 001*
*Ph. No. 07152 - 240284* Fax : 07152 - 241684
E-mail : Iper4160@gmail.com
Website : www.iperwardha.com

# विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती



# प्रा. राम मेघे स्मृती विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा - २०१९

## वादविवादाचा प्रस्ताव

*या सभागृहाच्या मते,*

*"समाजमाध्यमांचा समाजावर दुष्परिणाम होत आहे"*
*"सोशल मिडीया का समाजपर विपरीत परिणाम हो रहा है"*
*"Social Media have adverse effect on Society"*

* स्थळ *

**महाविद्यालयाचे सभागृह**

*** तारीख व वेळ ***

मंगळवार, २९ जानेवारी २०१९ सकाळी ९.३० वाजता

*** आयोजक ***

प्राचार्य
औषधनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था,
बोरगांव (मेघे), वर्धा.

# भूमिका

**प्रा. राम मेघे स्मृती विदर्भस्तरीय**
**आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे**
**हे चौदावे वर्ष आहे, हि स्पर्धा**
**दि. २९ जानेवारी २०१९ ला**
**प्रा. राम मेघे यांच्या स्मृती दिनी आमच्या**
**महाविद्यालयात संपन्न होत आहे.**

प्रा. राम मेघे यांच्या राजकारण, समाजकारण, शिक्षण व सहकार आदि क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीची ज्योत सतत तेवत राहावी व अशा अष्टपैलू व्यक्तिमत्वाची स्मृती जागृत राहावी. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यामध्ये असलेल्या सुप्त गुणांना चालना देण्यासाठी व नव्या प्रतिभा संपन्न वाणीला प्रोत्साहित करण्यासाठी या वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

## ~~~ स्पर्धेची वैशिष्ट्ये ~~~

सांघिक बक्षिसे

*गुणानुक्रमे श्रेष्ठ ठरणाऱ्या चमूस*

*प्रा. राम मेघे स्मृती फिरता चषक प्रदान करण्यात येईल.*

## वैयक्तिक पारितोषिके

प्रथम पारितोषिक : रू. ५००१/- रोख
व्दितीय पारितोषिक : रू. ३००१/- रोख
तृतीय पारितोषिक : रू. २००१/- रोख

सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील.

- ❑ प्रा. राम मेघे उर्फ बाबूजी हे व्यक्तिमत्व अनेक गुणवैशिष्ट्यांनी संपन्न व समृध्द होतं. स्पष्टवक्तेपणा, दुरदृष्टी, चिकाटी, सत्यवचन आदि गुणांनी त्यांचे जीवन नटलेलं होतं.
- ❑ सत्तानिरपेक्ष समाजकारण आणि राजकारण करण्याचे व आपल्या जीवनमूल्यांशी कोणताही समझोता न करता तन-मन-धनाने, समर्पित भावनेने समाजसेवा करण्याचे, प्रतिभाशाली समाजमन घडविण्याचे ध्येय प्रा. राम मेघे यांच्या अंगी होते.
- ❑ विदर्भाच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकारी व विविध विधायक जडणघडणीत आदरणीय प्रा. राम मेघे यांचा सिंहाचा वाटा आहे. तळागाळातील व ग्रामीण भागातील साधनवंचितांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्या, यासाठी ५२ वर्षापूर्वी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे लहानसे रोपटे त्यांनी अमरावतीत लावले, आज ग्रामीण भागात अभियांत्रिकी आणि वैद्यकीय ज्ञानासह तंत्रज्ञानाच्या शैक्षणिक सुविधा पोहचविण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला.

## ~~~ जीवनपट ~~~

**कॅबिनेट मंत्री –**

शिक्षण व आरोग्य, क्रिडा सांस्कृतिक कार्य, रोजगार, महाराष्ट्र राज्य

**चेअरमन –**

- प्राथमिक शिक्षण आयोग,
- विदर्भ वैधानिक विकास महामंडळ,
- श्री कोंडेश्वर सहकारी साखर कारखाना मर्यादित, फुबगांव.
- विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती

**सदस्य –**

- महाराष्ट्र प्रदेश सांसदीय मंडळ,
- कार्यकारी सदस्य, महाराष्ट्र काँग्रेस कमिटी अ. भा. काँग्रेस समिती,
- कार्यकारी सदस्य, अमरावती विद्यापीठ,
- कार्यकारी सदस्य, म. रा. माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ,
- राज्यस्तरीय सहकार समिती, कॉटन फेडरेशन,
- राज्य सहकारी साखर संघ.

# प्रवेश अर्जाचे प्रारूप

प्रति,
प्राचार्य
औषधनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, बोरगांव (मेघे),
वर्धा - ४४२ ००१

विषय - वादविवाद स्पर्धेत सहभागाबाबत

महोदय,

आपल्या परिपत्रकानुसार आम्ही आमच्या महाविद्यालयाच्या वतीने स्व. प्रा. राम मेघे यांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत सहभाग घेण्याकरिता दोन स्पर्धकांचा संघ पाठवित आहोत.

१) स्पर्धकाचे नांव :
वर्ग : ______ जन्मतारीख : ______ वय : ____
प्रस्तावाची बाजू अनुकूल/प्रतिकूल

२) स्पर्धकाचे नांव :
वर्ग : ______ जन्मतारीख : ______ वय : ____
प्रस्तावाची बाजू अनुकूल/प्रतिकूल

मी, प्राचार्य हमी देतो की, आमचे स्पर्धक विद्यार्थी आपल्या सर्व अटी व नियमांचे पालन करतील. तसेच माझ्या महाविद्यलयाच्या संघाने चषक जिंकल्यास सदहू चषक पुढील वर्षी डिसेंबर महिण्यात स्वखर्चाने सुस्थितीत पोहचविण्याची व्यवस्था करीन, कृपया आमच्या महाविद्यालयाच्या चमूला स्पर्धेत सहभागी करून घ्यावे. हि विनंती.

प्राचार्य
(नाव, सही व शिक्का)
दुरध्वनी क्रमांक